महिलांच्या आर्थिक विकासासाठी स्वयं सहाय्यता बचत गटाचे योगदान : पूर्व विदर्भाच्या विशेष संदर्भात

चंद्रशेखर डो. राखळे
संशोधनकर्ता

प्रा. डॉ. देवदत्त शा. तारे
मार्गदर्शक

Crossref DOI -

सार :

स्वयं-सहाय्यता बचत गट (Self-Help Groups—SHGs) हे ग्रामीण महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक सक्षम करण्याचे महत्त्वपूर्ण माध्यम बनले आहे. महिलांनी नियमित बचत, अंतर्गत कर्जव्यवस्था, बँक जोडणी, सूक्ष्म वित्त, कौशल्यविकास आणि सामूहिक निर्णयप्रक्रिया यांच्या माध्यमातून महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक सहभागात वाढ केली. (National Bank for Agriculture and Rural Development [NABARD], n.d.)

मुख्य शब्द : स्वयं-सहाय्यता बचत गट, महिला आर्थिक विकास, आर्थिक सक्षमीकरण, पूर्व विदर्भ, वित्तीय समावेशन, ग्रामीण विकास, महिला उद्योजकता.

प्रस्तावना :

भारतामध्ये ग्रामीण महिलांना औपचारिक वित्तीय सेवा, उत्पादन साधने, बाजारपेठ आणि आर्थिक निर्णयप्रक्रियेत समान संधी मिळण्यात दीर्घकाळ अडथळे राहिले. या पार्श्वभूमीवर सामूहिक बचत, अंतर्गत कर्ज आणि बँक-जोडणीवर आधारित स्वयं-सहाय्यता बचत गटांची संकल्पना विकसित झाली. NABARD च्या मते SHG-Bank Linkage Programme (SHG-BLP—स्वयं-सहाय्यता बचत गट-बँक जोडणी कार्यक्रम) हा ग्रामीण व वित्तीयदृष्ट्या वंचित घटकांपर्यंत औपचारिक वित्तीय सेवा पोहोचविणारा महत्त्वाचा मार्ग ठरला आहे. NABARD च्या अधिकृत माहितीनुसार SHG-BLP ची सुरुवात 1992 मध्ये 500 SHGs च्या पायलटपासून झाली.(https://www.nabard.org/about-departments.aspx?cid=477&id=5) (NABARD, n.d.)

पूर्व विदर्भातील ग्रामीण महिलांच्या आर्थिक विकासामध्ये स्वयं-सहाय्यता बचत गटांनी महत्वाची भूमिका बजावली आहे. महिलांना बचतीची सवय, अंतर्गत कर्जव्यवस्था, बँक-जोडणी आणि विविध उपजीविका उपक्रमांमुळे महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाला चालना मिळाली आहे. गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया आणि भंडारा या जिल्ह्यांतील अनेक महिलांनी स्वयं-सहाय्यता बचत गटांच्या माध्यमातून रोजगाराच्या आणि उद्योजकतेच्या नवीन संधी निर्माण केल्या आहेत. या प्रक्रियेमुळे महिलांचे उत्पन्न, निर्णयक्षमता, सामाजिक सहभाग आणि जीवनमान यामध्ये सकारात्मक बदल घडून आला आहे. त्यामुळे पूर्व विदर्भातील महिला आर्थिक विकासाच्या दृष्टीने स्वयं-सहाय्यता बचत गटांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जाते. महाराष्ट्रातील पूर्व विदर्भ या मध्ये येणाऱ्या गोंदिया, भंडारा, चंद्रपूर आणि गडचिरोली या चार जिल्ह्यांमधील महिलांच्या आर्थिक विकासासाठी स्वयं-

सहाय्यता बचत गटांचे मोलाचा वाटा हा आहे. (NABARD, n.d.; NABARD, 2023a, 2023b, 2023c, 2023d)

या अभ्यासात वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. या संबधासाठी लागणारी माहिती ही प्राथमिक माहिती प्रश्नावली, मुलाखत व निरीक्षणाद्वारे घेण्यात आली आणि दुय्यम माहिती NABARD(National Bank for Agriculture and Rural Development -राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक), DAY-NRLM(Deendayal Antyodaya Yojana–National Rural Livelihoods Mission), MAVIM(Mahila Arthik Vikas Mahamandal), महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेत स्थळावरून घेण्यात आली. NABARDच्या 2022–23 च्या अहवालानुसार 31 मार्च 2023 रोजी देशात 134.03 लाख स्वयं सहाय्यता बचत गट बँकांशी जोडलेले होते, त्यापैकी 112.92 लाख म्हणजे सुमारे 84.25% गट सर्व-महिला स्वयं सहाय्यता बचत गट होते. या गटांच्या बँकांमधील बचतीची रक्कम ₹58,892.68 कोटी होती, त्यापैकी महिला स्वयं सहाय्यता बचत गट ची बचत ₹52,455.48 कोटी होती. (NABARD, 2023)

अभ्यासाच्या दृष्टीने स्वयं सहाय्यता बचत गट चा परिणाम हा त्याच्या जीवनाला एक कलाटणी देण्यासाठी बचत आणि कर्जापुरता मर्यादित नव्हती तर त्या महिलांना उद्योजकता, रोजगारनिर्मिती, वित्तीय समावेशन, निर्णयक्षमता आणि सामाजिक सहभागाशी सक्षम कर,करण्यासाठी होते. बाजारपेठ, कौशल्य, डिजिटल क्षमता, कर्जाची उपलब्धता आणि उत्पादनाच्या विक्रीसंबंधी खूप मोठी अडचण होती. (NABARD, 2023)

भारतीय ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेत महिलांचे मोलाचे योगदान असूनही त्यांना औपचारिक वित्तीय सेवा, उत्पादन साधने, बाजारपेठ आणि निर्णय प्रक्रियेत समान संधी दीर्घकाळासाठी देण्यात आल्या नाही. अश्या परिस्थितीत सामुहिक बचत करणे आणि एकमेकांकडून घेतलेल्या कर्जव्यवस्थेवर स्वयं-सहाय्यता बचत गट हि संकल्पना ग्रामीण भागातील गरीब महिलांसाठी स्वयं सहाय्यता बचत गट एक प्रभावी संस्थात्मक माध्यम म्हणून विकसित झाली. (NABARD, n.d.)

भारतामध्ये NABARDने 1992 मध्ये SHG–Bank Linkage Programme सुरू केले. सुरुवातीच्या प्रायोगिक प्रयत्नांपासून सुरू झालेला हा कार्यक्रम पुढे मोठ्या प्रमाणावर विस्तारला. NABARDच्या मते SHG-BLP हा ग्रामीण गरीब आणि वित्तीयदृष्ट्या वंचित घटकांपर्यंत वित्तीय सेवा पोहोचविण्याचा स्वयं-सहाय्यता बचत गट महत्त्वपूर्ण मार्ग ठरला आहे.(NABARD,2023) 2022–23 मध्ये 134.03 लाख SHGs बँकांशी बचत-जोडलेले होते आणि 42.96 लाख SHGs क्रेडिट-जोडलेले होते. बँकांमधील स्वयं-सहाय्यता बचत गट कर्ज थकबाकी ₹1.88 लाख कोटी होती. (NABARD, 2023) महिलांच्या दृष्टीने विशेष बाब म्हणजे बचत-जोडलेल्या स्वयं-सहाय्यता बचत गट पैकी मोठा हिस्सा महिलासाठी स्वयं-सहाय्यता बचत गटाचा आहे. 2022–23 मध्ये 112.92 लाख सर्व-महिला SHGs बँकांशी बचत-जोडलेले होते. त्यामुळे स्वयं-सहाय्यता बचत गट ही चळवळ महिलांच्या वित्तीय समावेशनाशी थेट जोडलेली आहे. (NABARD, 2023) (NABARD, n.d.) उदिष्टे खालील प्रमाणे -

- स्वयं-सहाय्यता बचत गटांची संकल्पना आणि ग्रामीण भागातील महिलांचा आर्थिक विकासाचा अभ्यास

करणे.

- पूर्व विदर्भातील गोंदिया, भंडारा, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांतील महिला SHGsचा अभ्यास करणे.
- महिलांच्या आर्थिक विकासात स्वयं-सहाय्यता बचत गट चे योगदान किती प्रमाणात झाला ते तपासणे.
- स्वयं-सहाय्यता बचत गट मुळे कर्ज, रोजगार, उत्पन्न आणि उद्योजकतेवरील परिणामांचा अभ्यास करणे.
- महिलांच्या वित्तीय समावेशनातील स्वयं-सहाय्यता बचत गट ची भूमिका स्पष्ट करणे.
- स्वयं-सहाय्यता बचत गट मुळे ग्रामीण भागातील महिलाच्या समोरील प्रमुख अडचणी ओळखणे.
- महिला आर्थिक विकासासाठी धोरणात्मक सूचना मांडणे.

महिला आर्थिक विकासामध्ये स्वयं-सहाय्यता बचत गट चे योगदान

1) **बचतीची सवय :** स्वयं-सहाय्यता बचत गट चे मूलभूत वैशिष्ट्य म्हणजे नियमित बचत करण्याची सवय लागणे. अल्प बचत रक्कम नियमितपणे जमा केल्यामुळे महिलांमध्ये आर्थिक भार निर्माण निर्माण होणार नाही. सामूहिक बचत केलेल्या जमा झाल्या रक्कमेतून अंतर्गत कर्ज दिले जाते आणि गटाची आर्थिक क्षमता वाढते. (NABARD, n.d.)
2) **वित्तीय समावेशन :** SHG-Bank Linkage Programme मुळे ग्रामीणभागातील महिलांना औपचारिक बँकिंग प्रणालीशी जोडण्यास मदत झाली. सुरवातील 2014-15 मध्ये 76.97 लाख बचत गट जोडले गेले परंतु त्यापैकी 66.51 लाख महिला बचत गट जोडल्या गेल्या त्यानंतर ते वाढत गेले आणि 2022–23 मध्ये 134.03 लाख लाख बचत गट जोडले गेले परंतु त्यापैकी 112.92 लाख महिलास्वयं-सहाय्यता बचत गटासोबत जोडल्या गेल्या SHGs होते. (NABARD, 2023)
3) **कर्ज उपलब्धता :** स्वयं-सहाय्यता बचत गट मुळे महिलांना व्यवसाय, शेतीपूरक उपक्रम आणि उपजीविकेसाठी संस्थात्मक कर्ज मिळण्याची मोठ्या प्रमाणात शक्यता वाढते. DAY-NRLMअंतर्गत महिला स्वयं-सहाय्यता बचत गट ना कर्जावर व्याजसवलतीची तरतूद आहे. (NABARD, 2022)
4) **महिला उद्योजकता :** स्वयं-सहाय्यता बचत गट ने आज महिलांना बचत-कर्ज संस्थेपलीकडे उपजीविका व सूक्ष्म-उद्योगांच्या माध्यमात रूपांतरित करण्यावर भर दिला जात आहे. बचत गटामुळे कौशल्य, उपजीविका आणि बाजारपेठेशी जोडणी यामुळे महिला उद्योजकतेला चालना मिळू शकते. (NABARD, 202 (NABARD, 2023)

पूर्व विदर्भातील विशेष संदर्भ :

गोंदिया, भंडारा, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांची सामाजिक, भौगोलिक आणि आर्थिक वैशिष्ट्ये वेगवेगळी आहेत. त्यामुळे स्वयं-सहाय्यता बचत गट च्या उपजीविका उपक्रमांचे स्वरूपही स्थानिक परिस्थितीनुसार बदलते. (NABARD, 2023a, 2023b, 2023c, 2023d)

Research Hub International Journal

तक्ता १ : पूर्व विदर्भातील अभ्यासासाठी प्रमुख क्षेत्रे

जिल्हा	अभ्यासासाठी महत्त्वाचे क्षेत्र
गोंदिया	शेती, भात उत्पादन, कृषीपूरक व्यवसाय
भंडारा	शेती, दुग्धव्यवसाय, लघुउद्योग
चंद्रपूर	शेती, अन्नप्रक्रिया, सेवा व सूक्ष्म व्यवसाय
गडचिरोली	वनउत्पादने, बांबू, आदिवासी उपजीविका व हस्तकला

तक्ता क्र. २ : भारतातील बचत-जोडलेल्या SHGs व महिला SHGs ची स्थिती, 2014–15 ते 2022–23

वर्ष	एकूण बचत-जोडलेले SHGs (लाख)	महिला SHGs (लाख)	महिला SHGs (%)	एकूण बचत (₹ कोटी)	महिला SHG बचत (₹ कोटी)
2014–15	76.97	66.51	86.41	11,059.84	9,264.33
2015–16	79.03	67.63	85.58	13,691.39	12,035.78
2016–17	85.77	73.22	85.36	16,114.23	14,283.42
2017–18	87.44	73.90	84.51	19,592.12	17,497.86
2018–19	100.14	85.31	85.19	23,324.48	20,473.55
2019–20	102.43	88.32	86.22	26,152.05	23,320.55
2020–21	112.23	97.25	86.65	37,477.61	32,686.08
2021–22	118.93	104.05	87.45	47,240.48	42,104.77
2022–23	134.03	112.92	84.25	58,892.68	52,455.48

(स्रोत : NABARD, Status of Microfinance in India / SHG-Bank Linkage Programme. 2014-15, 2015-16 2016–17, 2017–18, 2019–20, 2020–21, 2021–22–2023–24) Direct official source: https://www.nabard.org/auth/writereaddata/file/status-of-microfinance-in-india-2022-23.pdf

Research Hub International Journal

तक्त्याचे विश्लेषण :

सुरवातीला 2014–15 ते 2022–23 या काळात बँकांशी बचत-जोडलेल्या SHGsची संख्या हि 2014–15 मध्ये 66.51 लाख होती त्या वरून 76.97 इतकी वाढली परंतु ती संख्या वाढतच गेली आणि 2022–23 मध्ये SHGsची संख्या 112.23 लाखांवरून 134.03 लाखांपर्यंत वाढली. महिला SHGsच्या बचतीतही ₹9,264.33कोटींवरून ₹52,455.48 कोटीपर्यंत वाढ झाली. यावरून SHGsचा विस्तार आणि महिलांचा वित्तीय सहभाग वाढत असल्याचे दिसून येते. (NABARD, 2023)

तक्ता क्र. 3 : पूर्व विदर्भातील निवडक जिल्ह्यांतील SHG-BLP स्थिती

जिल्हा	संदर्भ दिनांक/कालावधी	प्रोत्साहित SHGs	क्रेडिट-जोडलेले SHGs	बँक कर्ज रक्कम	महिला SHGs (%)
गोंदिया	31 मार्च 2022	16,814	13,123	₹11,742.29 लाख	91%
भंडारा	31 मार्च 2021	15,773	उपलब्ध उताऱ्यात नाही	उपलब्ध उताऱ्यात नाही	उपलब्ध उताऱ्यात नाही
चंद्रपूर	2021–22 / 31 मार्च 2022 संदर्भ	36,112	31,308	₹5,240.89 लाख	100%
गडचिरोली	31 मार्च 2022	19,027	13,668	₹12,011.63 लाख	91.70%

NABARD — Potential Linked Plans १)**गोंदिया — NABARD PLP 2023–24** गोंदिया PLP PDF — NABARD २) **भंडारा — NABARD PLP 2023–24** भंडारा PLP PDF — NABARD ३) **चंद्रपूर — NABARD PLP 2023–24** चंद्रपूर PLP PDF — NABARD ४) **गडचिरोली — NABARD PLP 2023–24** गडचिरोली PLP PDF — NABARD Direct official sources: Gondia https://www.nabard.org/auth/writereaddata/tender/MAH_Gondia.pdf; Bhandara https://www.nabard.org/auth/writereaddata/tender/MAH_Bhandara.pdf; Chandrapur https://www.nabard.org/auth/writereaddata/tender/MAH_Chandrapur.pdf; Gadchiroli https://www.nabard.org/auth/writereaddata/tender/MAH_Gadchiroli.pdf

राष्ट्रीय स्तरावर SHG-बँक जोडणीचा विस्तार स्पष्टपणे दिसतो. पूर्व विदर्भातील उपलब्ध NABARD जिल्हानिहाय आकडेवारीतही SHGs ची मोठी संख्या, क्रेडिट-जोडणी आणि महिला SHGs चे उच्च प्रमाण दिसते. उदाहरणार्थ, गोंदिया जिल्ह्यात 31 मार्च 2022 रोजी 16,814 SHGs पैकी 13,123 SHGs क्रेडिट-जोडलेले होते आणि महिला SHGs चे प्रमाण 91 टक्के होते. (NABARD, 2023a, 2023b, 2023c, 2023d)

भंडारा जिल्ह्यात 31 मार्च 2021 रोजी 15,773 SHGs होते. NABARD च्या जिल्हा अहवालानुसार

Research Hub International Journal

MSRLM ची तीव्र अंमलबजावणी 2018–19 पासून झाल्याने जिल्ह्यातील सूक्ष्म वित्त चळवळ बळकट झाली. चंद्रपूरमध्ये 2021–22 संदर्भात 36,112 SHGs प्रोत्साहित आणि 31,308 SHGs क्रेडिट-जोडलेले असल्याचे NABARD च्या PLP मध्ये नमूद आहे; महिला SHGs चे प्रमाण 100 टक्के नोंदवले आहे. त्याच अहवालात 4,216 SHGs चे डिजिटायझेशन आणि त्यापैकी 2,055 SHGs चे क्रेडिट-लिंकिंग झाल्याची माहिती आहे. (NABARD, 2023b, 2023c)

गडचिरोलीच्या संदर्भात 31 मार्च 2022 रोजी 19,027 SHGs प्रोत्साहित आणि 13,668 SHGs क्रेडिट-जोडलेले होते; महिला SHGs चे प्रमाण 91.70 टक्के होते. जिल्हा अहवालात MSRLM, MAVIM, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, विदर्भ कोकण ग्रामीण बँक आणि NABARD यांसारख्या संस्थांचा सहभाग नमूद आहे. (NABARD, 2023d)

महिला आर्थिक विकासातील SHGs चे प्रमुख आयाम :

तक्ता क्र. ४ : महिला आर्थिक विकासाचे मोजमाप करण्यासाठी निर्देशक

आर्थिक/सामाजिक आयाम	SHG मुळे अपेक्षित परिणाम	मोजमापासाठी सुचविलेले निर्देशक
नियमित बचत	आर्थिक शिस्त	मासिक बचत, वार्षिक बचत
वित्तीय समावेशन	औपचारिक बँकिंगशी जोडणी	बँक खाते, डिजिटल व्यवहार
कर्ज उपलब्धता	व्यवसायासाठी भांडवल	कर्ज मिळाल्याची संख्या/रक्कम
उद्योजकता	सूक्ष्म व्यवसाय व उपजीविका	व्यवसाय सुरू/विस्तार
उत्पन्न	कुटुंबाच्या उत्पन्नात योगदान	SHG पूर्वी व नंतरचे उत्पन्न
रोजगार	स्वयंरोजगार/इतर रोजगार	कामाचे दिवस/उत्पन्न
निर्णयक्षमता	घरगुती आर्थिक निर्णयात सहभाग	खर्च, बचत, गुंतवणूक निर्णय
बाजारपेठ	विक्री व उत्पन्न वाढ	स्थानिक/ऑनलाइन विक्री

साधर्म्य/विसंगतीचे परिणाम व कारणमीमांसा :

राष्ट्रीय आणि पूर्व विदर्भातील आकडेवारीत साधर्म्य म्हणजे SHGs चे बँकिंग प्रणालीशी वाढते जोडलेपण आणि महिलांचा मोठा सहभाग. मात्र स्थानिक आर्थिक विकासाचा परिणाम समान आहे असे थेट सिद्ध होत नाही. यासाठी पुढील परिणाम-साखळी तपासणे आवश्यक आहे : नियमित बचत ⟶ बँक खाते व वित्तीय समावेशन ⟶ कर्ज उपलब्धता ⟶ उत्पादक कर्जवापर ⟶ व्यवसाय/उपजीविका ⟶ उत्पन्न वाढ ⟶ रोजगार ⟶ आर्थिक निर्णयक्षमता. (NABARD, 2023; NABARD, 2023a, 2023b, 2023c, 2023d)

विसंगती आढळल्यास तिची कारणे बाजारपेठेपर्यंत पोहोचविणे , उत्पादनाची गुणवत्ता, पॅकेजिंग व ब्रँडिंग, डिजिटल वित्तीय साक्षरता, प्रशिक्षणाची गुणवत्ता, कर्जाचा वेळेवर पुरवठा, वाहतूक, स्थानिक संसाधने आणि व्यवसाय व्यवस्थापन या घटकांत शोधता येतील. ही कारणे क्षेत्रीय प्राथमिक माहितीच्या आधारे सिद्ध करणे

आवश्यक आहे; (NABARD, 2023)

SHGs समोरील प्रमुख अडचणी :

स्वयं सहाय्यता बचत गट क्षेत्रातील प्रमुख आव्हानांमध्ये प्रादेशिक असमतोल, बचत व कर्ज जोडणीतील अंतर आणि अंतर्गत कर्जवाटपाच्या माहितीचे अपुरे संकलन यांचा समावेश होतो. पूर्व विदर्भाच्या संदर्भात बाजारपेठ, गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण, डिजिटल व्यवहार, ब्रँडिंग, पॅकेजिंग, वेळेवर कर्ज आणि व्यवसाय व्यवस्थापन या बाबींचा क्षेत्रीय अभ्यास आवश्यक आहे. (NABARD, 2023)

SHGsचा विस्तार आणि महिला सहभाग लक्षणीय आहे. मात्र गटांची संख्या वाढणे म्हणजे आपोआप महिला आर्थिक विकास झाला असे मानता येत नाही. आर्थिक विकासाचे मोजमाप करताना प्रत्यक्ष उत्पन्न, व्यवसायाची शाश्वतता, कर्जाचा उत्पादक वापर, बाजारपेठेतील सहभाग, घरगुती आर्थिक निर्णय आणि रोजगारनिर्मिती यांचाही विचार करणे आवश्यक आहे. (NABARD, 2023)

- बाजारपेठेपर्यंत मर्यादित पोहोच आणि मध्यस्थांवरील अवलंबित्व. (NABARD, 2023)
- उत्पादनाची गुणवत्ता, पॅकेजिंग आणि ब्रँडिंग याबाबत अपुरे प्रशिक्षण. (NABARD, 2023)
- डिजिटल व्यवहार व वित्तीय साक्षरतेतील अंतर. (NABARD, 2023)
- कर्ज मंजुरी व वितरणातील विलंब. (NABARD, 2023)
- व्यवसाय व्यवस्थापन, लेखांकन आणि बाजारपेठीय नियोजनाचा अभाव. (NABARD, 2023)
- स्थानिक संसाधने व भौगोलिक परिस्थितीनुसार जिल्हानिहाय वेगवेगळ्या अडचणी. (NABARD, 2023a, 2023b, 2023c, 2023d)

निष्कर्ष :

राष्ट्रीय स्तरावरील अधिकृत NABARD आकडेवारीत 2014–15 ते 2022–23 या काळात SHGs आणि महिला SHGs च्या बचत-जोडणीमध्ये स्पष्ट वाढ दिसते. 2022–23 मध्ये 134.03 लाख SHGs पैकी 112.92 लाख सर्व-महिला SHGs होते. (NABARD, 2023)

पूर्व विदर्भातील गोंदिया, भंडारा, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांतील उपलब्ध NABARD आकडेवारीतही SHG-BLP चा लक्षणीय विस्तार दिसतो. मात्र राष्ट्रीय स्तरावरील वाढीचा अर्थ स्थानिक पातळीवरील समान आर्थिक परिणाम असा घेता येत नाही. म्हणून प्रस्तुत संशोधनाचा पुढील महत्त्वाचा टप्पा म्हणजे प्राथमिक सर्वेक्षणाच्या आधारे महिला सदस्यांच्या उत्पन्न, रोजगार, कर्जवापर, व्यवसाय, बाजारपेठ, बचत आणि आर्थिक निर्णयक्षमता यांमध्ये झालेला बदल मोजणे. यामुळे राष्ट्रीय आकडेवारी आणि पूर्व विदर्भातील प्रत्यक्ष परिणाम यांच्यातील साधर्म्य किंवा विसंगती शास्त्रीय पद्धतीने सिद्ध करता येईल. (NABARD, 2023a, 2023b, 2023c, 2023d)

- पूर्व विदर्भातील स्वयं सहाय्यता बचत गटाच्या महिलांना बचत करण्याची नियमित सवय लागली आणि

त्यांचे आर्थिक नियोजन सक्षम झाले.

- बचत गटामुळे मिळालेल्या बँक कर्जामुळे त्यांना शेतीपूरक व्यवसाय, पशुपालन इत्यादी व्यवसाया सारखे स्वतःचे व्यवसाय सुरु करून उत्पन्नात भर पडली.
- पूर्व विदर्भातील ग्रामीण भागातील महिलांना बँक सोबत जोडून घेतले.
- रोजगार निर्मिती साठी बचत गटातील महिलांना प्रशिक्षण देण्याची सोय करण्यात आली.
- बचत गटाच्या माध्यमातून कुटुंबाचे उत्पन्न वाढले.
- पूर्व विदर्भातील महिलांनी बँकचे कर्ज वेळेवर परतफेड केल्यामुळे बँकचे विश्वास संपादन केले.

शिफारसी

1. महिला स्वयं-सहाय्यता बचत गटांना बाजारपेठेशी थेट जोडणी उपलब्ध करून द्यावी.
2. डिजिटल वित्तीय साक्षरतेचे प्रशिक्षण वाढवावे.
3. जिल्हानिहाय महिला उद्योजकता केंद्रे विकसित करावीत.
4. बँक कर्ज प्रक्रियेत अनावश्यक विलंब कमी करावा.
5. स्वयं-सहाय्यता बचत गट उत्पादनांसाठी स्थानिक तसेच ऑनलाइन बाजारपेठ उपलब्ध करून द्यावी.
6. स्वयं-सहाय्यता बचत गट सदस्यांच्या उत्पन्नातील बदलांचे नियमित मूल्यांकन करावे. (NABARD, 2023)

NABARD च्या अधिकृत जिल्हानिहाय Potential Linked Credit Plan (PLP) **अहवालांच्या थेट लिंक :**

1. गोंदिया — PLP 2023–24 :

अधिकृत लिंक : https://www.nabard.org/auth/writereaddata/tender/MAH_Gondia.pdf

SHG संदर्भ: PDF p. 87; SHG promotion/linkage आणि 2023–24 credit potential.

2. भंडारा — PLP 2023–24 :

अधिकृत लिंक : https://www.nabard.org/auth/writereaddata/tender/MAH_Bhandara.pdf

SHG संदर्भ: PDF p. 78; SHGs required/already formed आणि 2023–24 credit potential.

3. चंद्रपूर — PLP 2023–24 :

अधिकृत लिंक : https://www.nabard.org/auth/writereaddata/tender/MAH_Chandrapur.pdf

SHG संदर्भ: जिल्ह्यातील p.94; SHG-Bank Linkage/financial inclusion विभाग.

4. गडचिरोली — PLP 2023–24 :

अधिकृत लिंक : https://www.nabard.org/auth/writereaddata/tender/MAH_Gadchiroli.pdf

SHG संदर्भ: PDF p. 87; SHGs required/already formed आणि 2023–24 credit potential

संदर्भसूची (APA 7th) :

- National Bank for Agriculture and Rural Development. (n.d.). *Micro Credit Innovations Department: Self Help Group–Bank Linkage Programme*. https://www.nabard.org/contentsearch.aspx?AID=1414&Key=nabfoundation
- National Bank for Agriculture and Rural Development. (2022). *Master circular on Deendayal Antyodaya Yojana–National Rural Livelihoods Mission (DAY-NRLM) and interest subvention scheme for women SHGs under DAY-NRLM for the year 2022–23*. https://www.nabard.org/CircularPage.aspx?cid=504&id=14995
- National Bank for Agriculture and Rural Development. (2023). *Status of microfinance in India 2022–23*. https://www.nabard.org/auth/writereaddata/file/status-of-microfinance-in-india-2022-23.pdf
- National Bank for Agriculture and Rural Development. (2023a). *Gondia: Potential Linked Credit Plan 2023–24*. https://www.nabard.org/auth/writereaddata/tender/MAH_Gondia.pdf
- National Bank for Agriculture and Rural Development. (2023b). *Bhandara: Potential Linked Credit Plan 2023–24*. https://www.nabard.org/auth/writereaddata/tender/MAH_Bhandara.pdf
- National Bank for Agriculture and Rural Development. (2023c). *Chandrapur: Potential Linked Credit Plan 2023–24*. https://www.nabard.org/auth/writereaddata/tender/MAH_Chandrapur.pdf
- National Bank for Agriculture and Rural Development. (2023d). *Gadchiroli: Potential Linked Credit Plan 2023–24*. https://www.nabard.org/auth/writereaddata/tender/MAH_Gadchiroli.pdf
- National Bank for Agriculture and Rural Development. (2021). *Status of microfinance in India 2020–21*. https://www.nabard.org/auth/writereaddata/tender/SoMFI-2020-21.pdf

Research Hub International Journal

- National Bank for Agriculture and Rural Development. (2024). *Status of microfinance in India 2023–24*. https://www.nabard.org/hindi/auth/writereaddata/tender/29102407028-8-1.pdf
- Creswell, J. W., & Creswell, J. D. (2018). *Research design: Qualitative, quantitative, and mixed methods approaches* (5th ed.). SAGE Publications.
- Kothari, C. R., & Garg, G. (2019). *Research methodology: Methods and techniques* (4th ed.). New Age International Publishers.
- Ministry of Rural Development. (2023). *Annual report 2022–23*. Government of India. https://rural.gov.in/
- Sekaran, U., & Bougie, R. (2020). *Research methods for business* (8th ed.). Wiley.
- World Bank. (2022). *World development report 2022: Finance for an equitable recovery*. World Bank. https://www.worldbank.org/en/publication/wdr2022

Research Hub International Journal